साहित्य, कला, संस्कृती, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी
विचाराशी बांधिलकी ठेवणारे मासिक

# लोक प्रवक्ता

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक

वर्ष : चौथे / अंक : आठवा, एप्रिल - मे - २०१३
स्वागत मूल्य : १५/-



संपादक
सौ. सुनिता ते. गाडेकर
औरंगाबाद.



डॉ. भवरलाल जैन
संस्थापक, 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' जळगाव

काही देखणे।

# गांधी विचार व जीवन कार्याचे नवे आंतरराष्ट्रीय ज्ञानपीठ : गांधी तीर्थ जळगाव / विनोद रापतवार

**गांधीतीर्थच्या निर्माणच्यावेळी अगदी बारीक सारीक गोष्टींचा विचार करण्यात आले आहे. इथले मोहन ते महात्मा हे प्रदर्शन माहितीपूर्ण आहे. जोधपूरच्या गुलाबी रंगाच्या दगडात या वास्तूची निर्मिती करण्यात आल्यामुळे किमान ३ शतकांपेक्षा अधिक या वास्तुला भीती नाही. तीन मजली इमारतीत हे प्रदर्शन आहे असे मुळी वाटत नाही किंवा बघताना थकवाही येत नाही अशी पद्धतशीर रचना करण्यात आली आहे. चित्र, फोटो, वस्तु, तसेच प्रकाश आणि ध्वनी योजनेचा अत्यंत कौशल्याने उपयोग करण्यात आला आहे. प्रदर्शनाच्या पहिल्याच दालनात गांधीजींच्या काळातील गुजरातचं चित्र उभारण्यात आले आहे. लहानपणीचे गांधीजींचे फोटो, त्यावेळी पोरबंदर कसे होते ते दर्शविणारे फोटो, भिंतीवर गुजरात शैलीतील चित्र साकारण्यात आली आहेत.**

महात्मा गांधींचे नाव ज्याला ज्ञान नाही असा व्यक्ती सापडणे दुर्मिळ आहे. शालेय जीवनात बापूंच्या रुपात भावलेल्या माहात्मा गांधी बद्दल आजवरच्या पिढ्यांमध्ये नकळत एक आदराचे स्थान मनात घर करुन आहे. विज्ञानाशी जवळीकता आणि आध्यात्मिक भावना जपून सर्वधर्म समभाव जपत समाजातील रंजल्या-गांजल्या व्यक्तिंच्या सेवेचे व्रत अंगी बाळगून मानवतेच्या धर्माला त्यांनी एका अधिष्ठाण दिले. ते ही त्या कर्मठ आणि सनातनी काळात, आज प्रत्येकाच्या मनात बापूंनी आदरराचे स्थान जरी निर्माण केलेले असले तरी या महात्माच्या जीवन कार्याचे आणि विचारांचे पावित्र्य कित्येकात आहे हे आपण स्वत:च तपासून घेतले पाहिजे. शालेय अभ्यासक्रमाच्या पल्याड कित्येक पटीने समृद्ध जीवन कार्यानुभव व त्यांचे संचित बापूंनी निर्माण करुन ठेवले आहे. या संचिताचा प्रकाश प्रत्येकाचे मनात जर भिनला तर प्रत्येकात असलेल्या सत्याच्या प्रकाशाचे देवघर उजळून निघाल्याशिवाय राहणार नाही. महात्मा गांधींच्या जीवन मूल्य, सत्य, अहिंसा, शांती, परस्परांतील सौहार्द भावना यांचा परिचय व प्रसार नव्या पिढीपर्यंत व्हावा या उदात्त हेतुने जळगाव येथे गांधीतीर्थच्या माध्यमातून एक जागतिक दर्जाचे म्युझियम व अध्यासन मार्च पासून महाराष्ट्रात उपलब्ध झाले आहे. जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री भवरलाल जैन यांनी गांधींवरील असलेली नितांत श्रद्धा जपत गांधी रिसर्च फाउंडेशन जळगावच्या माध्यमातून हे जागतिक केंद्र साकारले आहे. त्या अध्यासनाविषयी......

जसजसा काळ बदलत आह तसतसे जवळपास प्रत्येकाची भावना ही आपल्या गरजापेक्षा अधिक प्राप्त करण्याच्या लालसेने झपाटलेला दिसतो आहे. यात असंख्य भौतिक गरजा या निसर्गाच्या मूलस्त्रोत्रांवर अवलंबून असल्याने त्या अमूल्य नैसर्गिक संसाधनांवर घाला पडतो आहे. एका बाजूला

गरीब अधिक गरीब होत आहेत तर दुसऱ्या बाजूला श्रीमंत हे अधिक श्रीमंत होत आहेत. समाजातील या वाढत्या असतानतेमुळे असंतोष आणि तवाण निर्माण झाला नाही तर नवलच. या अशांततेच्या वातावरणात एकमेकांविरुद्ध कुरघोडी व स्पेर्धेच्या दृष्टीकोनामुळे संपूर्ण जग हे अणूबॉम्बच्या दहशतीखाली केंव्हा पोहोचले हे लक्षातही आले नाही. परस्परातील भेदभाव समोपचाराने मिटवून शाश्वत विकाच्यादृष्टीने प्रयत्न करण्याची गरज म्हणूनच या पिढीसाठी महत्वाची आहे. महात्मा गांधीनी आपल्या जीवनकार्यातून, सत्याच्या प्रयोगातून समाजासाठी रचनात्मक आणि विधायक कार्य कसे करता येवू शकते याचा आदर्शवस्तूपाठ आपल्यापुढे ठेवला आहे. गरज आहे ती पुन्हा एकादा गांधीच्या विचारांना अभ्यासण्याची. समाजाची ही नेमकी गरज ओळखून जळगाव येथील गांधीतीर्थचे खोज गांधीकी हे म्युझियम व यातील अनुभव येथे भेट देणाऱ्याच्या मनात नवा दृष्टीकोन दिल्याशिवाय राहत नाही. जैन इरिगेशन सिस्टिम्स कंपनी ही जळगाव जिल्ह्यापुरती मर्यादित नसून शेती, शेतकरी आणि पण्याशी जिव्हाळयाचे नाते जपणारी ही संस्था हजारो कोटींची उलाढाल करीत आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. मात्र औद्योगिक क्षेत्रात भरारी मारतानाच या कंपनीने सामाजिक बांधीलकी जोपाण्याचे मोलाचे काम केले आहे. जैन इरिगेशन आणि भवरलाल व कांताबाई फाऊंडेशन हे गांधी रिसर्च फाऊंडेशन प्रकल्पाचे मुख्य प्रायोजक आहेत.

पाचोरा रस्त्यावरील जैन हिल्स निसर्गरम्य परिसरातील महात्मा गांधी यांच्या जीवनचरित्र, साहित्य, घडामोडी, त्यांची अहिंसा मार्गाची चळवळ, देश-विदेशातील त्यांच्या चळवळीची आठवण करुन देणारे हे तीर्थ म्हणजे एक विद्यापीठाच म्हणावे लागेल. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे एक स्मारक उभारावे असे स्वप्न पाहणाऱ्या पद्मश्री डॉ.भंवरलाल जैन यांनी गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या रुपात गांधी तीर्थ उभारुन आपले स्वप्न पूर्ण तर केलेच, पण त्याचबरोबर देश-विदेश्यातील आजच्या तसेच भावी पिढ्यांसमोर महात्मा गांधीच्या जीवनावर आधारित एक विशाल संग्रहायल समर्पित केले आहे.

**आणि विचारांना प्रत्यक्ष कृतिची जोड मिळाली......**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदान समारंभात न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी महात्मा गांधीजींच्या खान्देशातील (कान्हदेश) वास्तव्याला अधोरेखीत करुन या भागात गांधी अध्यासन केंद्र आकारास यावे असे आवाहन केले होते. यासाठी एखाद्या तरी गांधीप्रेमी व्यक्तीने पुढाकार घेतला पाहिजे अशी आर्त हाक ही त्यांनी दिली होती. योगायोगाने या समारोहास जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन देखील उपस्थित होते. न्यायमूर्तींची आर्ज हाक लक्षात घेत त्याच संध्याकाळी भवरलालजी जैन यांनी न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांची भेट घेऊन 'गांधी रिसर्च फाऊंडेशन'च्या स्थापनेचा संकल्प केला. सुरुवातीला गांधी रिसर्च फाऊंडेशनसाठी सर्व साहित्य निरनिराळया ठिकाणाहून एकत्र करण्यावर भर देण्यात आला. ज्या ज्या ठिकाणी गांधी केंद्र आहेत त्या त्या ठिकाणचे गांधीजींवरील पुस्तके, दुर्मिळ साहित्य जमविण्यासाठी प्राधान्य दिले. भारतातील काही गांधी संग्रहालयात आउट ऑफ प्रिंट झालेल्या ग्रंथांना हाताळण्यायोग्य करण्याचे आव्हान होते. विविध संस्थांनी सहकार्याचा हात पुढे केला मात्र ही ग्रंथ संपदा जीर्ण असल्यामुळे त्याला नवतंत्रज्ञानाचे जोड देत आकारास आणण्याशिवाय गत्यंतर नव्हते. यासाठी जर्मन तंत्रज्ञानाने साकारलेले स्कॅनिंग मशीन खास आयात करुन घेतले. या स्कॅनरद्वारे दुर्मिळ ग्रंथसंपदाला नवीन जन्म मिळाला. जवळपास दहा वर्षे या कामासाठी खर्ची पडले. या कामाचा आवाका इतका मोठा आहे की यापुढेही हे काम अधिक गतीने हाती घेणे आवश्यक झाले. या अथक प्रयत्नांमुळे स्कॅनिंग करुन असंख्य दुर्मीळ पुस्तकांचा मोठा संग्रह गांधीतीर्थमध्ये आहे.हा संग्रह अभ्यासकांना संदर्भासाठी पाहता येतो.

जैन हिल्स परिसरातील निसर्गरम्य अशा आमराई असलेल्या भागात चार एकर क्षेत्रात सुमारे ६५ हजार चौरस फूट परिसरात गांधी रिसर्च फाऊंडेशन, पर्यावरण संरक्षण करुन उभे राहिले आहे. या विशाल भवनात अध्यापन, ग्रंथालय, वाचनालय, संग्रहालय, अभिलेखागार, सभागृहची व्यवस्था करण्यात आली आहे.

**गांधीजींशी संबंधित वस्तू :**

१९३६ चे अधिवेशन फैजपूर येथे पार पडले.

महात्मा गांधींनीच अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यावेळी त्यांनी घातलेली सुताची माळ,चप्पल, आंघोळीचा दगड रिसर्च फाऊंडेशनमध्ये उपलब्ध आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनमध्ये गांधी व विनोबा भावे यांच्याशी संबंधि प्रकाशित-अप्रकाशित साहित्य, ऑडिओ, व्हिडीओ, छायाचित्र, दस्तावेज, तिकिटे, लिफाफे, नाणे व नोटा संग्रहित करण्यात आल्या आहेत. महात्मा गांधी नियमितपणे काही ना काही लिहित असत. त्या साऱ्यांचा संग्रह गांधी वाड्मयात केला गेला आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशन एक आंतरराष्ट्रीय अभ्यास व संशोधन संस्था असल्याने सर्व आधारभूत साहित्य व वस्तूंचे संकलन यात करण्यात येत आहे. या केंद्रामार्फत अभ्यास, अध्ययन करणाऱ्यांना विद्यापीठामार्फत प्रमाणपत्र देण्यासंदर्भात काही विद्यापीठांशी करार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. याचबरोबर गांधी रिसर्च फाऊंडेशनने गांधींच्या संस्कारांचे शिक्षण देण्यासाठी काही विद्यापीठांशी करार केला आहे. खान्देशात गांधीविचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासोबत करार करण्यात आला आहे. अशाप्रकारे विविध विद्यापीठांशी करार करण्यात आल्यामुळे येणाऱ्या शैक्षणिक सत्रापासून म्हणजे जुलै २०१२ पासून प्रमाणपत्र अभ्यासक्रम, डिप्लोमा, डिग्री, पदव्युत्तर, पदवी, एम.फिल. शोध, पीएचडी, पोस्ट डॉक्टोरोल शोध व अंशकालीन शोध अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

**गांधीविचार संस्कार परीक्षा :**

महात्मा गांधींनी आजीवन सत्य, अहिंसा, प्रेम यांचीच साधना केली. त्यामुळे त्याला अनुसरून गांधी रिसर्च फाऊंडेशनने प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर गांधीजींचे संस्कार करण्यासाठी गांधीविचार संस्कार परीक्षेचे आयोजन केले जात आहे. योजनेचा जळगावसह धुळे, नंदुरबार व औरंगाबाद जिल्ह्यात प्रसार करण्यात येऊन पुढे राज्यातील आणखी १८ जिल्ह्यात तसा प्रसार केला गेला व फाऊंडेशनद्वारा आयोजित संस्कार परीक्षेत ३१ हजार ३५४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. डॉ. भवरलाल जैन व अशोक जैन यांच्या दिशानिर्देशांना अनुसरून फाऊंडेशनच्या परिसरात पुस्तक विक्री केंद्र स्थापन करण्यात आले आहे. यात जानेवारी २००९ ते फेब्रुवारी २०१२ पर्यंत मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील १,१६,४४४ पुस्तकांची विक्री करण्यात आली.

**खादी विक्री केंद्र :**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी गांधीजींना खादीचा विशेष प्रसार व प्रचार केला. खादीचे कपडे, शर्ट, कुडता, पायजमा, टोपी, रुमाल तसेच ग्राम उद्योगातील अनेक वस्तु उपलब्ध आहेत. गांधी रिसर्च फाऊंडेशन या देशातील एकमेव अशा गांधी तीर्थाला हिमाचल प्रदेशचे राज्यपाल विषणू सदाशिव कोकजे, ब्रह्मविद्या आश्रम मंदिर पवनारचे गौतम बजाज, महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्थान मगनवाडीचे डॉ. कर्मराज यादव, सायटस विद्यापीठ मेक्सिकोचे डॉ. स्कॉट, प्रविणा देसाई, भालचंद्र नेमाडे, सर्वोदय समाजचे डॉ. एस.एन. सुब्बाराव, श्रीमती निर्मला देशपांडे, नारायणभाई देसाई (वेडची गुजरात), बाबुभाई ठक्कर-मुंबई आदि मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत.

**विलोभनीय गांधीतीर्थ :**

गांधीतीर्थच्या निर्माणच्यावेळी अगदी बारीक सारीक गोष्टींचा विचार करण्यात आले आहे. इथले मोहन ते महात्मा हे प्रदर्शन माहितीपूर्ण आहे. जोधपूरच्या गुलाबी रंगाच्या दगडात या वास्तूची निर्मिती करण्यात आल्यामुळे किमान ३ शतकांपेक्षा अधिक या वास्तुला भीती नाही. तीन मजली इमारतीत हे प्रदर्शन आहे असे मुळी वाटत नाही किंवा बघताना थकवाही येत नाही अशी पद्धतशीर रचना करण्यात आली आहे. चित्र, फोटो, वस्तु, तसेच प्रकाश आणि ध्वनी योजनेचा अत्यंत कौशल्याने उपयोग करण्यात आला आहे. प्रदर्शनाच्या पहिल्याच दालनात गांधीजींच्या काळातील गुजरातचं चित्र उभारण्यात आले आहे. लहानपणीचे गांधीजींचे फोटो, त्यावेळी पोरबंदर कसे होते ते दर्शविणारे फोटो, भिंतीवर गुजरात शैलीतील चित्र साकारण्यात आली आहेत. बॅरिस्टर होण्यासाठी गांधीजी जेव्हा ब्रिटनला गेले त्यावेळीचे युरोप, तेथील वातावरण आणि त्यावेळी राहण्याची खोली इतकेच नव्हे तर फर्निचर देखील त्या धाटणीचे ठेवण्यात आले आहे. या दालनात आपण युरोपच्या त्या घरात तर नव्हे ना असा भास होतो. गांधीजींच्या जन्मापासून तर मृत्युपर्यंत म्हणजे १८६८ ते १९४८ या

कालखंडात महात्मा गांधीजींच्या जीवनात घडलेल्या महत्त्वपूर्ण प्रसंगांचे एक एक करीत दर्शन या प्रदर्शनात घडते. हा संदर्भ दस्तावेज देखील म्हणता येईल. सुप्रसिद्ध शिल्पकार सदाशिव साठे आणि राम सुतार यांनी साकारलेली गांधीजींची शिल्प एका वेगळ्या उंचीवर आणून सोडतात. स्थानिक चित्रकार ते दिग्गज चित्रकारांकडून गांधीजींची चित्रे साकारली आहेत. यातील मनोज साकळे यांनी ऑडीटोरियमच्या प्रदर्शनी भिंतीवर म्यूरल पेंटींग अत्यंत सुंदर आणि मनमोहक दिसते. यातील चारकोल आऊटलायनिंग व अॅक्रेलीक रंगांनी साकारलेलं त्यांचं पेंटिंग गांधीजी आणि लहान मुलं यांच्यातील निष्पाप भाव प्रकट करण्यात कमालीचं कसब वापरलं आहे. हे सामान्य प्रदर्शन नसून गांधी विचारांना उद्घृत करणारे असामान्य प्रदर्शन आहे. टॅबलेट, कॉम्प्युटर, स्क्रिन, बायोस्कोप, मॉडेल्स याच्या जोडीला ऑडिओ गाईड देखील असल्याने गांधी युगच जणू आपल्या पुढ्यात अवतरते. एक छायाचित्र हजार शब्दांचे काम करतात असे म्हणतात हे प्रदर्शन म्हणजे गांधी विचारांना अनुभवणारे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन म्हणता येईल. जळगावला आल्यावर प्रत्येकाने बघावे असेच हे प्रदर्शन आहे.

**- विनोद रापतवार**

जळगाव, ९४२३७७४३२६

